# नागपूर जिल्हा (ग्रामीण) पोलीस वार्तापत्र
## पोलीस अधिक्षक कार्यालय, नागपूर.

दिनांक 09/03/2023 (गुरूवार) सकाळ


### विनयभंग

पो.स्टे. केळवद :— दिनांक ०८/०३/२०२३ चे ०८.३० वा. दरम्यान यातील फिर्यादी/पिडीता वय २७ वर्ष व आरोपी नामे— श्रावण उदेकर, वय ४५ वर्ष, रा . वार्ड क्र ०१ जलालखेडा यांचे घर एकमेकांचे शेजारी असून नमुद घटना वेळी यातील फिर्यादी ही किराणा दुकानात भगर आणणे करीता जात असता यातील आरोपीने फिर्यादीला पाहुन शिवीगाळ करुन मी तुला एवढे बोललो फरक पडला नाही असे म्हणुन त्याने फिर्यादीचा साडीचा पदर पकडुन ओढला फिर्यादीची बेइज्जती केली. त्यामुळे फिर्यादीने आरडाओरड केली त्यामुळे फिर्यादीचे पती व गावातील लोकांच्या मदतीने फिर्यादीला सोडविले.

सदर प्रकरणी फिर्यादी यांचे रिपोर्टवरुन पो.स्टे. केळवद येथे आरोपीविरुध्द कलम ३५४, २९४ भादंवि कायद्यान्वये गुन्हा नोंद करण्यात आलेला आहे. आरोपीला सुचनापत्रावर सोडण्यात आले असुन गुन्हयाचा पुढील सहायक फौजदार ब. नं. ७७१ रामराव पवार मो. नं. ७८७५९८३३६० हे करीत आहे.

### पळवून नेणाऱ्या आरोपीविरूध्द गुन्हा दाखल

पो.स्टे. जलालखेडा :— दिनांक ०७/०३/२०२३ चे १५:०० वा. दरम्यान पो.स्टे. जलालखेडा हद्दीत यातील संशयीत आरोपी नामे— वैभव भाऊराव धानोरकर, वय अंदाजे २१ वर्ष रा. दिंदरगाव ता. नरखेड जि. नागपुर याने फिर्यादीची अल्पवयीन नात वय १३ वर्ष १० महिने हिला कशाचेतरी आमीष दाखवुन फुस लावुन फिर्यादीचे कायदेशीर रखवालीतुन पळवुन नेले आहे. अशा फिर्यादीच्या तोंडी रिपोर्ट वरून गुन्हा नोंद असुन सदर गुन्हयातील पिडीत मुलगी ही दि. ०८/०३/२०२३ रोजी मिळुन आली असुन सदर गुन्हयात पिडीतेचे बयान तसेच फिर्यादीचे बयाना वरुन सदर गुन्हयातील पिडीत मुलगी ही (अनुसुचित जाती) व आरोपी हा (इतर मागास प्रवर्गातील) आहेत.

सदर प्रकरणी फिर्यादी यांच्या रिपोर्टवरुन पो.स्टे. जलालखेडा येथे आरोपीविरुध्द कलम ३६३ भांदवि कायद्यान्वये गुन्हा नोंद करण्यात आला होता. सदर गुन्हयात तपासा दरम्यान सान्हा क्र. २६/२३ वेळ २३.४० वा. कलम ३, २ (व्हिअं) अ.जा.ज.अ.प्र.का. अन्वये कलमवाढ करण्यात आली असुन आरोपीला अटक करण्यात आली आहे. सदर गुन्हयाचा पुढील तपास मा. श्री. नागेश जाधव उपविभागीय पोलीस अधिकारी काटोल विभाग काटोल हे करीत आहे.

# गैरकायदयाची मंडळी

**पो.स्टे. खापरखेडा :–** अंतर्गत ०६ कि. मी अंतरावरील डब्लू सी एल कॉलनी सिल्लेवाडा येथे दिनांक ०६/०३/२०२३ चे १४.३० वा. दरम्यान यातील आरोपी नामे– 1) लक्ष्मीनारायण भिकरराम पासवान, रा. शिवनगर चनकापूर २) अजित लक्ष्मीनारायण पासवान, रा. कोराडी नाका नागपूर ३) निखिल अशोक पासवान, रा. दहेगाव रंगारी ४) विवेक अशोक पासवान, रा. दहेगाव रंगारी ५) अरुणा अजित पासवान रा. कोराडी नाका नागपूर यांनी संगनमत करून घराच्या प्रॉपर्टीचे कारणावरून फिर्यादी व त्याची आई बहीण व भाऊजी यांच्यासोबत झगडा भांडण करून शिवीगाळ केली तसेच फिर्यादीचे डोक्याला काठीने व हातबुक्कीने मारपिट केली नातेवाईकाला सुद्धा गंभीर मार लागला असून जीवाने मारण्याची धमकी दिली.

सदर प्रकरणी फिर्यादी यांचे रिपोर्टवरुन पो.स्टे. खापरखेडा येथे आरोपीविरुध्द कलम ४५२, ३२४, १४३, १४७, १४९, ५०४, ५०६ भा.द.वि अन्वये गुन्हा नोंद केला होता. आरोपीतांचा शोध सुरू असुन सदर गुन्हयाचा पुढील तपास पोहवा अमोल लोहकरे ब. नं १६७३ मो. नं ८६६८८३३४७७ हे करीत आहे.

**पोलीस माहिती कक्ष**
**नागपूर जिल्हा (ग्रामीण), नागपूर**